मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्तांची मतमोजणी केंद्रास भेट

**विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणाऱ्या मतमोजणी केंद्रास सुरक्षिततेच्या दृष्टीने भेट : सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या**

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणाऱ्या मतमोजणी केंद्रास जिल्हाधिकारी सुहास दिवसे व पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने भेट देत पाहणी केली. बालेवाडी स्टेडिअम, थेरगाव येथील मतमोजणी केंद्र तसेच मावळ विधानसभा मतदार संघाची मतमोजणी होणारे तळेगाव दाभाडे येथील नूतन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे





संयुक्त भेट देत सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी सहपोलिस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे, विशाल गायकवाड, सहायक पोलिस आयुक्त सुनील कुराडे, अपर तहसीलदार जयराज देशमुख, तहसीलदार विक्रम देशमुख तसेच मतमोजणी केंद्राशी संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महापालिकेच्या वतीने पद्मविभूषण रतन टाटा यांना श्रद्धांजली

**शहराच्या जडणघडणीत पद्मविभूषण रतन टाटा यांचा सिंहाचा वाटा आहे.**



**पिंपरी | प्रतिनिधी**

पद्मविभूषण रतन टाटा यांचे बुधवारी (९ ऑक्टोबर) निधन झाले. त्यांना महापालिकेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी आयुक्त शेखर सिंह यांनी पद्मविभूषण रतन टाटा यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले, उपआयुक्त अण्णा बोदडे, निलेश भदाणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शहराला औद्योगिक नगरी हे नाव सार्थ ठरविण्यामध्येही टाटा उद्योग समूहाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. अनेक लघुउद्योग या शहरात सुरू होऊन बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध झाला. अनेकांचे जीवनमान उंचावण्यासाठी यामुळे मदत झाली. या समुहाची धुरा सांभाळताना त्यांनी सेवाव्रती आयुष्य जगत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी पुढाकार घेऊन आपले जीवन व्यतीत केले. कोविड संकटकाळात पिंपरी-चिंचवड महापालिकेला त्यांनी मदत केली. परोपकारी वृत्ती, सामाजिक बांधिलकी, सचोटी, जिद्द, नैतिकता, उद्यमशीलता, संयम, साधेपणा, नम्रपणा यांचा अपूर्व संगम असलेले तसेच समाजसेवेप्रती समर्पित असलेले हे बहुआयामी अलौकिक व्यक्तिमत्व सर्व समाजासाठी आदर्श होते. यशाच्या शिखरावर असताना देखील एक उत्तम माणूस म्हणून सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे व्यक्तिमत्व तसेच उद्योगविश्वातील लखलखता तारा निखळल्याची खंत सर्व स्तरावरून व्यक्त केली जात आहे.


## नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरला रतन टाटांचे नाव द्यावे..!

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भाजपा आमदार महेश लांडगे यांचे निवेदन**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील महत्त्वाकांक्षी नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरला पद्मभूषण रतन टाटा यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले आहे. उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात भारताची मान जगभरात उंचावणारे देशाचे महान सुपुत्र पद्मभूषण सर रतन टाटा यांचे नुकतेच निधन झाले. संपूर्ण देशाने शोक व्यक्त केला आणि दुखवटा पाळला.

औद्योगिक नगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडच्या विकासामध्ये टाटा ग्रुपचा मोलाचा वाटा राहिला आहे. टाटा मोटर्स कंपनीच्या माध्यमातून शहरात औद्योगिक क्षेत्राला सुरूवात झाली. आज आयटी-ऑटो आणि इंडस्टिअल हब म्हणून शहराची प्रगती होत आहे.



> शहरातील नाशिफ फाटा ते खेड एलिव्हेटेड महामार्ग हा रेसिडेन्सिअल आणि इंडस्ट्रिअल कॉरिडॉरचा मोठा दुवा होणार असून, शहराच्या प्रगतीशील वाटचालीला नवा आयाम मिळणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पला " रतन टाटा एलिव्हेटेड कॉरिडॉर" म्हणून नाव द्यावे. ज्यामुळे पिंपरी-चिंचवड आणि पुणेकरांना स्व. रतन टाटा यांचे सदैव स्मरण राहील, अशी आमची भावना आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

आमदार महेश लांडगे म्हणाले की, टाटा ग्रुप आणि रतन टाटा यांच्याप्रति आम्हा पिंपरी-चिंचवडकरांच्या मनामध्ये अपार आदराची भावना आहे. केंद्र सरकारने नुकतेच पुणे- नाशिक महामार्गावर नाशिफ फाटा ते खेड एलिव्हेटेड महामार्गाच्या कामाला मंजुरी दिली आणि सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या एलिव्हेटेड कॅरिडॉरला रतन टाटा यांचे नाव देणे उचित होणार आहे.

पिंपरी-नाशिक फाटा ते खेड या दोन्ही बाजूंच्या 2 लेन सर्व्हिस रोडसह सध्याच्या रस्त्याचे 4/6 लेनमध्ये अपग्रेड केले जातील. याशिवाय 8 लेनचा उड्डाणपूल तयार केला जाईल. या प्रकल्पामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच चाकण परिसराच्या विकासातील एक मोठा अडथळा दूर होईल. यामुळे या भागातील ऑटोमोबाईल क्षेत्र तसेच इतर उद्योगांसाठी लॉजिस्टिक्स क्षमता वाढेल, वाहतूक खर्च कमी होईल तसेच ट्रॅफिक जाम आणि प्रदूषणाची समस्या दूर करण्यास मदत होईल. हा कॉरिडॉर मेगा फूड पार्क, टेक्सटाईल क्लस्टर्स, SEZ, फार्मा आणि मेडिकल क्लस्टर्स आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादन केंद्रासह 10 आर्थिक नोड्सना कनेक्टिव्हिटी प्रदान करेल, ज्यामध्ये नऊ जंक्शन्स आणि सुलभ वाहतूकीसाठी दोन मोठे पूल समाविष्ट आहेत,

# महापालिकेत 'माननीयां'ची धावपळ

## यंदा 970 शाळांमध्ये आरटीईच्या 17,588 जागा उपलब्ध : त्यासाठी 48,155 अर्ज

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. आचारसंहितेचा फटका बसू नये, यासाठी अधिकाधिक निविदा मंजूर करण्याबरोबरच विकासकामांचा कार्यारंभ आदेश काढण्यासाठी महापालिकेत धावपळ सुरू झाली आहे.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून महापालिकेत स्थायी समिती, इस्टिमेट कमिटी यासह महत्त्वाच्या खात्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत २२० निविदा मंजूर करण्यात आल्या असून त्याची किंमत सर्वसाधारण ४०० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येते. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची ही बैठक पार पडली.



राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता पुढील तीन ते चार दिवसांत लागण्याची शक्यता आहे. आचारसंहिता सुरू झाल्यानंतर नव्याने कोणत्याही कामाची निविदा काढता येत नाही तसेच काम सुरू करण्याची परवानगी देखील दिली जात नाही.

यामुळे आचारसंहिता काळात विकासकामे करताना प्रशासनाला मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागते. हे टाळण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी काम सुरू करण्याची परवानगी देण्याचे नियोजन पालिकेच्या वतीने केले जात आहे.

आचारसंहिता लागण्यापूर्वी विविध निविदा मंजूर करण्यासोबतच मंजूर झालेल्या कामाच्या कार्यारंभ आदेश काढण्यासाठी महापालिकेत धावपळ सुरू आहे. आचारसंहितेमध्ये आपल्या भागातील विकासकामांच्या निविदा अडकून पडू नये, या निविदा मान्य होऊन काम सुरू करण्याची परवानगी मिळावी, यासाठी शहरातील विद्यमान आमदारांसह आजी-माजी नगरसेवकांची आणि ठेकेदारांची गर्दी पालिकेत पहायला मिळत आहे. धावपळ करणाऱ्यांमध्ये सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांची मोठी संख्या आहे.

स्थायीच्या बैठकीत विषय मंजूर करून घेण्यासाठी विभागप्रमुखांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवसभर जोरदार धावपळ सुरू होती. महत्त्वाचे आणि शहराच्या विकासाला आवश्यक असलेल्या विषयांचे प्रस्ताव तयार करून ते मंजुरीसाठी पालिका आयुक्तांच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयात घेऊन जात असल्याचे चित्र पहायला मिळत होते. अधिकाधिक विकासकामे मार्गी लागावी यासाठी रात्री उशिरापर्यंत काही विभाग आणि तेथील अधिकारी पालिकेत कार्यरत असल्याचे दिसून आले.

### 400 कोटी रुपयांच्या 220 निविदा मंजूर

» आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही कामांना मंजुरी देता येत नाही. त्यामुळे प्रशासनानेही आचारसंहितेच्या धास्तीने कामाचा वेग वाढविलेला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक झाली. गेल्या आठवड्यात देखील पालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत विविध प्रकारचे १६० प्रस्ताव मान्य करण्यात आले. यामध्ये ९० ते १०० कोटी रुपयांच्या कामांचा समावेश होता. गुरुवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये विविध कामांसाठी सुमारे ४०० कोटी रुपयांच्या २२० निविदा मंजूर करण्यात आल्या.

# डेक्कन येथील संभाजी महाराजांच्या पुतळ्यावर उभारणार मेघडंबरी

## किरेन रिजिजू यांचे आवाहन : पुण्यात दलित उद्योजकांसोबत साधला मुक्तसंवाद

**पुणे | प्रतिनिधी**

डेक्कन येथील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पुतळ्यावर मेघडंबरी उभारण्याची मागणी करण्यात आली होती. त्या मागणीला यश आले असून महापालिकेकडून मेघडंबरी उभारण्यात येणार आहे. याकामासाठी ४७ लाख २७ हजार रुपयांचा निधी मंजूर केला असून या प्रस्तावाला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. येथील स्मारक आणि गरवारे भुयारी मार्गाच्या परिसराचे सुशोभीकरणदेखील केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

डेक्कन जिमखाना परिसरात असलेल्या धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुतळा उभारण्यात आला आहे. येथे विविध राजकीय पक्ष तसेच संघटनांकडून पुतळ्याला अभिवादन करण्यात येते.



तसेच विविध उपक्रमांची राबविले जातात. संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला भेट देत पुष्पहार अर्पण करण्यासाठी गर्दी होत असते. डेक्कन परिसरातील महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर मेघडंबरी उभारण्यात यावी, तसेच येथील परिसराचे सुशोभीकरण केले जावे, अशी मागणी विश्व हिंदू मराठा संघाचे भूषण वरपे यांच्यासह राजकीय पक्षांसह इतर अनेक संघटनांनी महापालिकेकडे केली होती. तसेच सातत्याने पाठपुरावा देखिल करण्यात आला होता. याची दखल घेत महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी भवन विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख, कार्यकारी अभियंता वीरेंद्र केळकर व अन्य अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष जागेवर पाहाणी केली होती. यानंतर पालिकेच्या भवन विभागाने याबाबतचा प्रस्ताव तयार केला होता.

याअंतर्गत छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या भोवती बांधकामामध्ये चौथरा उभारण्यात येणार आहे. त्यावर पॉलिस्टर रेझिनचा वापर करून आकर्षक मेघडंबरी उभारण्यात येणार आहे. तसेच अभिवादनासाठी येणाऱ्या नागरिकांना उभे राहता यावे, यासाठीदेखील नव्याने चौथरा तयार करण्यात येणार आहे. या चौथऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी पायऱ्या उभारल्या जातील. तसेच दगडी बांधकामामध्ये सुशोभीकरण केले जाईल. यासाठी भवन विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

पूर्वगणन रकमेपेक्षा साडेपाच टक्के कमी दराने आलेल्या सर्वांत कमी दराच्या निविदेला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या कामात मेघडंबरीसह, जिने व चौथऱ्याच्या कामाचा समावेश आहे. कार्यादेश निघाल्यानंतर तीन महिन्यांत हे काम पूर्ण केले जाईल, असे कार्यकारी अभियंता वीरेंद्र केळकर यांनी सांगितले.

डेक्कन जिमखाना परिसरात असलेल्या धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून विविध उपक्रमांची सुरुवात होत असते. विविध राजकीय पक्षांचे नेते या भागात आल्यानंतर या ठिकाणी येऊन संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला भेट देत पुष्पहार अर्पण करत असतात. संभाजी महाराजांच्या या पूर्णाकृती पुतळ्यापासूनच मराठा समाजाचे 'एक मराठा, लाख मराठा' हे आंदोलन सुरू झाले होते. अनेक मोर्चे, आंदोलनाची सुरुवात येथून होत असते. त्यामुळे या पुतळ्याच्या आजूबाजूच्या परिसरात सुशोभीकरण करावे, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात होती.

# विद्यार्थी वाहतुकीच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना निघेना

## शालेय परिवहन समितीची बैठक कागदावरच : 58 शाळांमध्येच बैठक, कार्यवाहीवरून टोलवाटोलवी

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांमध्ये स्कूलबस अपघातांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत आरटीओ विभागाने पुढाकार घेऊन शाळा प्रशासनाशी संवाद साधला होता. मेल पाठवून शालेय परिवहन समिती तसेच, नियमांची पालन करण्याबाबत कळवले देखील होते. मात्र अद्याप परिवहन समिती कागदावरच असल्याचे दिसून येते. आत्तापर्यंत केवळ ५८ शाळांमध्येच ही बैठक झाली असल्याचे दिसून येते.

दुसरीकडे आरटीओ विभागाने संबंधित बैठकीवर कार्यवाही करण्याचे अधिकार शिक्षण विभागाला असल्याचे सांगितले आहे. तर, राज्य शासनाचे जे काय आदेश आहेत ते शाळा प्रशासनाकडे पोहोचवणे हे आपले काम असल्याचे महापालिका शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

शहरातील खासगी शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचप्रमाणे विविध उपनगरामध्ये प्री स्कूलही मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्यामुळे स्कूलबसमधून प्रवास करणारे विद्यार्थी सुरक्षित आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रत्येकवेळी जुजबी कारवाई केली जाते. नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे' होते, याबाबत ना आरटीओ विभाग पुढाकार घेताना दिसत आहे ना महापालिका स्तरावरती शिक्षण विभाग. परिणामी, अशा घटनांना वेळीच आळा घालण्याबाबत कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागात २,९५१ स्कूल बसची नोंद आहे. शालेय मुलांची वाहतूक करणाऱ्या वाहनामधून क्षमतेपेक्षा जादा वाहतूक सुरू आहे. अनेक चालकांकडे वैध योग्यता प्रमाणपत्र नाही. दुसरीकडे, प्रत्येक शालेय वाहनेने नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र आजही खाजगी वाहनातून अथवा रिक्षातून देखील सर्रासपणे विद्यार्थी वाहतूक होत असते. अनेकदा संबंधित वाहनचालक उपलब्ध नसल्यास दुसरीच वाहन पाठवले, असे अनेकदा घडत असते. त्या वाहन चालकाला याबाबत माहिती नसल्याने अपघातासारख्या घटना होतात. चालकांना वाहनांमध्ये परिचालक, अग्निशमन यंत्रणा, वाहनांना पिवळा रंग, आपत्कालीन दरवाजा, खिडकीच्या बाहेरील बाजूस आडवे लोखंडी बार यासह विविध नियम आहेत. पण, स्कूल व्हॅन, रिक्षाचालक या कोणत्याच नियमांचे पालन करत नाहीत. बॅज काढताना पोलिसांकडून चालकाची चारित्र्य पडताळणी होते. रिक्षा घेताना बॅज बंधनकारक असतो.



### शिक्षण विभागाला अधिकार

» शाळांवर परिवहन समिती स्थापन करा, अशी सूचना आम्ही करू शकतो. पण, कार्यवाही करायचा अधिकार शिक्षण विभागाला आहे. वाहनांमध्ये काही त्रुटी असतील, तर वाहनचालकांना दंड करण्याचा अधिकार आम्हाला आहे. त्याबाबत आमची नियमित तपासणी सुरू असते. त्याचप्रमाणे स्कूल बसचालकांनी आणखीन काही फिटनेस प्रमाणपत्र पूर्ण केले नाहीत. याबाबत त्यांना यापूर्वीच कळवले असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.

### उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई कधी?

» आरटीओकडून संबंधित शाळेत प्रशासनाकडे या समितीच्या बैठकीकडे कळवले जाते. यानंतर बैठकीचे संबंधितचे पत्र आरटीओ विभाग आणि पोलिसांना देणे गरजेचे असते. त्याबाबतची कारवाई आणि अधिकार हे शिक्षण विभागाला आहे. अशाप्रकारे उल्लंघन करणाऱ्या शाळेवर कारवाई करण्याबाबत कोणीही पुढाकार घेत नसल्याने समितीची बैठक केवळ कागदावर राहिली आहे.

“ महापालिका शाळांना बस सेवा नाहीत. खाजगी शाळांना त्या सेवा आहेत. त्यामुळे परिवहन आणि बस बाबतवर लक्ष ठेवण्यास आरटीओ आहे. राज्य शासनाने याबाबतच्या काही मार्गदर्शक तत्वे दिलेले आहेत ते सर्व शाळांपर्यंत आम्ही पोचवत आहोत.

- विजय थोरात, सहाय्यक आयुक्त,शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# एसटीमधील संपर्क क्रमांकाचे फलक गायब

## प्रवाशांची गैरसोय : प्रशासनाच्या सूचनेला केराची टोपली, प्रवाशांना विविध समस्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य महामार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व बसमध्ये चालकाच्या मागील बाजूस संबंधित बस ज्या आगाराची आहे, त्या आगारप्रमुखांचा, स्थानकप्रमुखांचा आणि कार्यशाळा अधीक्षकांचा दूरध्वनी क्रमांक प्रसिद्ध केले होते. मात्र त्या आदेशाची दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे. कारण, अवघ्या पाच ते सहा एसटीला हे फलक दिसून आले तर इतर एसटीमधील हे फलक गायब होते. त्यामुळे एकीकडे प्रवाशांची गैरसोय होत असताना, दुसरीकडे प्रशासनाच्या सूचनेला केराची टोपली दाखवण्यात आलेली आहे.

दोन आठवड्यांपूर्वी आदेश देऊनही अनेक बसमध्ये अजूनही नंबर प्रसिद्ध केले नाहीत. तर अनेक बसमधील नंबर असलेले स्टिकर्स फाडून टाकल्याचे दिसून आले. त्यामुळे या योजनेचा घाट प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी की उधळपट्टीसाठी होता? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विचार केला असता, पिंपरी आगरात जवळपास ५६ वाहने आहेत. मात्र त्यापैकी अगदी पाच ते सात बसमध्येच हे फलक दिसून आले. आगारात राज्यातील मराठवाडा, खान्देश आणि इतर ठिकाणाहून आलेल्या १२ एसटी बसची पाहणी केली. यात आगारप्रमुख, स्थानकप्रमुखांचा आणि कार्यशाळा अधीक्षकांचा दूरध्वनी क्रमांक असलेले फलक लावण्यात आले नव्हते. काही फलक फाडलेले दिसून आले.

एसटी प्रवासात चालक अतिवेगाने गाडी चालवत आहेत. अशा अनेक तक्रारी प्रवाशांना थेट आगारप्रमुखांना फोन करून सांगता याव्यात म्हणून आगारप्रमुखांचा, स्थानकप्रमुखांचा नंबर प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र चालक आणि वाहकांची तक्रार होत असल्याने स्टिकर्स फाडण्यात त्यांचा तर हात नाही ना? अशी शंका उपस्थित होत आहे. त्यातच प्रवाशांना आणखी या उपक्रमाची माहिती पोहोचू शकली नाही. ही माहिती प्रवाशांमध्ये पोहोचू नये, यासाठीच हे नंबर काढलेले दिसून आले. १५ दिवसांतच अनेक बसमधील नंबर असलेले फलक फाडून टाकल्याचे दिसून आले आहे.



### प्रवाशांना विविध समस्या

» महामंडळाच्या वतीने धावणारी शिवनेरी, शिवशाही या बसमध्ये चार्जिंग पॉईंट खराब झाले आहेत. बसमध्ये अस्वच्छता असल्याने प्रवाशांना त्याचा नाहक त्रास होतो. लांब पल्ल्याच्या प्रवासामुळे प्रवासी या बसेसला प्राधान्य देतात. मात्र, अनेकदा एसी चालत नसल्याने मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. पिंपरी चिंचवड विभागामध्ये १५ शिवशाही धावतात. मात्र अनेक बसमध्ये चार्जिंग पॉईंट आणि एसी बंद अवस्थेत आहेत.

# झाडे तोडण्याबाबत पुन्हा चूक झाल्यास दंडात्मक कारवाई

## संबंधित झाडे तोडण्यासाठी 96 झाडांवर लाल चिन्ह चुकून मारण्यात आले : महापालिकेची कबुली

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव पार्क परिसरातील साधू वासवानी पूल पाडून नवीन पूल बांधणीच्या कामामध्ये अडथळा येत नसतानाही अनेक झाडे तोडण्याचा महापालिकेने घातलेला घाट वृक्षप्रेमींनी थेट राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणापुढे (एनजीटी) मांडला. सुनावणीमध्ये संबंधित झाडे तोडण्यासाठी ९६ झाडांवर लाल चिन्ह चुकून मारण्यात आले असल्याची कबुली महापालिकेने दिली. 'अशी चुक पुन्हा करू नका, अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल', अशा शब्दांत न्यायाधिकरणाने महापालिकेस फटकारले.



वाहतुकीस धोकादायक झाल्याने कोरेगाव पार्क येथील साधू वासवानी पूल पाडून तेथे महापालिका प्रशासनाच्या विशेष प्रकल्प विभागाकडून नवीन पूल बांधण्यात येत आहे. मात्र, संबंधित पुलाजवळील जुन्या ९६ झाडांवर ही झाडे तोडण्यासाठी त्यावर लाल रंगाने चिन्हांकित करण्यात आले होते. हा प्रकार पुणे संवाद या संघटनेचे अमित सिंग, सत्या नटराजन, गंगोत्री चंदा, सेक्युलर कम्युनिटी यांच्यामार्फत ॲड. मैत्रेय घोरपडे यांनी याचिकेद्वारे 'एनजीटी' पुढे मांडला, याबाबतची माहिती त्यांनी शुक्रवारी दिली. यावेळी ॲड. मानसी ठाकरे या वेळी उपस्थित होत्या.

यासंदर्भात एनजीटीने प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्यासाठी समिती नेमली. त्यानुसार, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे संचालक अभय पिंपरकर यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांच्या पथकाने जुलै महिन्यात प्रत्यक्षात पाहणी केली. त्यावेळी वृक्ष संवर्धन कायद्यानुसार झाडांचे वय मोजण्यासाठी महापालिकेकडे कोणतीही शास्त्रीय पद्धत किंवा तंत्रज्ञान नसल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. तसेच तोडण्यासाठी ९६ झाडांवर लाल रंगाने चिन्हांकित करण्यात आल्याचे आढळून आले. त्यावेळी महापालिकेच्या विशेष प्रकल्प विभागाने ९६ झाडे चुकून चिन्हांकित करण्यात आले, असे सांगितले. त्याची गांभीर्याने दखल घेत न्यायाधिकरणाने, अशी चुक पुन्हा होऊ नये, झाली तर दंडात्मक कारवाई करू, आपली चूक दुरुस्त करा. तोडण्याची झाडे कमी करा. ६१ झाडांचे केलेले डॉकेट रद्द करून १८ झाडाचा प्रस्ताव तयार करून त्याची वृक्ष संवर्धन कायद्याच्या नियमानुसार अंमलबजावणी करण्याचे आदेश न्यायाधिकरणाने दिल्याचे घोरपडे यांनी सांगितले. याबाबतचा आदेश न्यायाधिकरणाचे अध्यक्ष न्यायाधीश दिनेश कुमार सिंग, तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी दिला.

वृक्ष वाचविण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल अर्जदार आणि प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्या हडपसर येथील ज्येष्ठ नागरिक नंदिनीदेवी पंत प्रतिनिधी यांनी लाल चिन्हांकित झाडांची गणना करून ही झाडे वाचविण्यासाठी वैयक्तिक प्रयत्न केल्याचेही न्यायाधिकरणाने विशेष नमूद केले.

> पुलाच्या परिसरातील ११९ पैकी ९६ झाडे तोडण्याचा घाट महापालिकेने घातला होता. महापालिकेच्या त्रुटी पुराव्यांसह आम्ही न्यायाधीकरणासमोर मांडल्या. त्यामुळे उर्वरित झाडे वाचली. विकास म्हणजे फक्त बांधकाम नव्हे, झाडे, पर्यावरणही जपले पाहिजे.
>
> - अमित सिंग, पर्यावरण संरक्षक कार्यकर्ते.

# सैनिकी शाळांमधील शिक्षण महागले

## राज्यातील सैनिकी शाळांच्या धोरणात सुधारणा : राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील सैनिकी शाळांच्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. सैनिकी शाळांना सी.बी.एस.ई. मंडळाचा अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे.

या शाळांमधील विद्यार्थ्यांकडून प्रतिवर्ष २० हजार रुपये शैक्षणिक शुल्क आकारण्यात येत होते. त्यात आता वाढत्या महागाईमुळे वाढ करण्यात आली असून प्रतिवर्ष प्रति विद्यार्थी ५० हजार रुपये शुल्क घेण्यात येणार आहे.



खाजगी अनुदानित सैनिकी शाळांच्या वाढीव तुकड्यांचा सतत वाढता खर्च, सैनिकी शाळांची खालावलेली स्थिती व सैनिकी शाळांच्या कामगिरीबाबत काळजी व्यक्त करण्यात आली होती. राज्यातील ३८ अनुदानित सैनिकी शाळांपैकी १२ सैनिकी शाळांना ३० एकरच्या मर्यादेत जमीन देण्यात आलेली आहे.

तथापि, राज्यातील सैनिकी शाळांमधून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मध्ये अगदी अत्यल्प विद्यार्थी प्रवेशित असल्यामुळे योजनेत सुधारणा करून शाळांच्या कामगिरीवर अधारीत अनुदान देण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्रीमंडळाने दिले होते.

मंत्रीमंडळाच्या निर्देशास अनुसरुन विभागाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.

राज्यातील खाजगी अनुदानित सैनिकी शाळांमध्ये अध्यापनाचे माध्यम इंग्रजी राहील. शाळांना सी.बी.एस.ई. मंडळाचा अभ्यासक्रम लागू करण्यात यावा.

अभ्यासक्रम राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी व इतर स्पर्धा परिक्षेस सुसंगत असल्यामुळे सैनिकी शाळांमधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मध्ये निवड होण्यास मदत होईल.

प्रत्येक सैनिकी शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या ६०० पेक्षा जास्त असता कामा नये. एका तुकडीत विद्यार्थ्यांची संख्या किमान ३० व कमाल ४५ इतक्या मर्यादेत असावी.

भोजनव्यवस्था, गणवेश, पुस्तके, शालेय साहित्य इत्यादींचा खर्च भागविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची आहे.

तथापि, सैनिकी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्याकरीता चांगले अन्न मिळावे या उद्देशाने मेस मॅनेजमेंट करीता प्रत्येक सैनिकी शाळेस प्रति महिना रूपये १ लाख याप्रमाणे ११ महिन्यांकरीता एकूण ३८ सैनिकी शाळांना रूपये ४ कोटी १८ लाख रुपये इतका निधी देण्यात येईल.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरीता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थेस प्रतिवर्षी रूपये २ कोटी इतका निधी देण्यात येईल.

या निधीतुन प्रशिक्षण अभ्यासक्रम निश्चित करून त्यानुसार प्रशिक्षण करणे आवश्यक राहील. याव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार नवीन भरती करावयाच्या शिक्षक, शिक्षकेतर व तांत्रिक पदांवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता लागणारा वाढीव खर्च भागविण्यात येईल.

परीक्षा मंडळ, विद्यार्थ्यांचा प्रवेश व प्रवेश परीक्षा, शिक्षकांचे समायोजन, राज्य सैनिका शाळा सनियंत्रण समिती, सैनिका शाळा मंडळ, पीपीपी धोरण, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा आकृतीबंध, अभ्यासक्रम, वेतन व वेतनेत्तर अनुदान, शाळांचे दैंनदिन वेळापत्रक, शैक्षणिक शुल्क, वित्तीय भार याबाबत सुधारणा करण्यात आलेली आहे.